Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९, अंक १४] गुरुवार ते बुधवार, एप्रिल ६-१२, २०२३/चैत्र १६-२२, शके १९४५ [पृष्ठे ८, किंमत : रुपये ३०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

	पृष्ठे
भाग एक-शासकीय अधिसूचना : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क, यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	नाही.
संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ., केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	१-८
भाग एक-अ.—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.	१-१३

शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४६७.

जिल्हाधिकारी, यांजकडून

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, सह महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६चे कलम १२६(४) प्रमाणे

अधिसूचना

क्रमांक अ.का-उविअ-नाग(श)-भुसं-कावि-६४-२०२३.—

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ क्रमांक टि.पी.एस- २४२२-३३०-प्र.क.९१-२०२२-नावि-९ चे कलम ३१ (१) अन्वये शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टि.पी.एस-२४९६-२६४३-प्र.क.३०० (अ) ९७-नावि-९, दिनांक ७ जानेवारी २००० अन्वये भागशः मंजूर व क्रमांक टी.पी.एस.-२४००-१६२८-प्र.क्र.२००-२००० नवि-९, दिनांक १० सप्टेंबर २००१ नुसार अंतिमतः मंजुर करण्यात आली असून ती अनुक्रमे दिनांक १ मार्च २००० व दिनांक २१ सप्टेंबर २००१ पासून अंमलात आलेली आहे.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजा-सिताबर्डी-कामठी रोड येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल. आय. सी. चौकापर्यंत विकास योजनेतील ३०.०० मीटर रुंदीचा रस्ता ३३.०० मीटर रुंदीचा करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांनी अधिसूचना व टि.पी.एस-२४२२- ३३०-प्र.क्र.९१-२०२२-नवि-९, दिनांक २५ जानेवारी, २०२३ अन्वये कलम ३७ मधील तरतुदी नुसार मंजूरी प्रदान केली आहे. तसेच रस्ता रुंदीकरणामुळे रुंदीकरण खालील खाजगी जागेचे संबंधात नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपलिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे.

तसेच उक्त मंजूर विकास योजनेनुसार विषयांकित सिताबर्डी-कामठी रोड येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल.आय.सी. चौकापर्यंत विकास योजनेतील ३०.०० मी. रुंद रस्त्याच्या रुंदीकरण करणेकरीता पहेलवान चौकापर्यंत १८ मीटर रुंद विकास योजना रस्ता रुंदीचा विकास योजना रस्ता म्हणून करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (२) अन्वये फेरबदल प्रस्तावास दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजीच्या महाराष्ट्र शासन अधिसूचनेनुसार मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. मौजा सिताबर्डी, तह. नागपूर येथील जमीन विकास योजनेनुसार सिताबर्डी-कामठी रोड येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल. आय. सी. चौकापर्यंत विकास योजनेतील ३०.०० मी. रुंदीचा रस्ता ३३.०० मीटर रुंद रस्त्याच्या रुंदीकरणाकरीता या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी क्षेत्र अधिसूचित करण्यासाठीच्या संपादनाच्या घोषणेची अधिसूचना प्रसिध्द केली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे नुसार खाजगी जागा विकास योजना रस्ता विकसित करण्याकरिता आवश्यक असल्यामुळे कलम १२६ अंतर्गत प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (२) व १२६ (४) अन्वये शासनाचे निर्णय क्र. टिपीबी-४३१४-१८१-प्र.क्र.९-२०१५-नवि-११, दि. २४ ऑगस्ट २०१५ अन्वये प्रदत्त अधिकारान्वये भूमि संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ ची कार्यवाहीसाठी उप संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी प्रस्ताव दि. ०३ फेब्रुवारी २०२३ अन्वये प्रस्तावित केले आहे. आणि, ज्याअर्थी, उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी, नागपूर यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी घ्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम संपूर्णपणे आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर मार्फत उक्त नियोजन प्राधिकरणाने अदा करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (२) मध्ये विनिर्दीष्ट केलेली कालमर्यादा उलटून गेलेली आहे.

त्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (४) सह भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे “ उक्त संपादन अधिनियम” म्हणून संबोधिलेल्या) च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, नागपूर याद्वारे असे घोषीत करतात की, उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक आहे.

उक्त जमिनीच्या संबंधित यापूढे करावयाच्या सर्व संपादनाच्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांचे काम पार पाडण्याकरीता उक्त संपादन अधिनियमाच्या कलम ३(ग) अन्वये याव्दारे उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, नागपूर शहर, नागपूर यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याप्रमाणे उक्त जमिनीच्या संपादनाची कार्यवाही उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरू करण्याबाबत निर्देशित करण्यात येत आहे.

उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, नागपूर शहर यांना उक्त अधिनियमाचे कलम २३ चे चौकशी दरम्यान उक्त अनूसुची मधील ज्या जमिनीचे नियोजन प्राधिकरणाने थेट खरेदीव्दारे किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) प्रमाणे संपादित केलेली असल्याचे अथवा फायदे घेतलेले असल्याचे आढळून आल्यास त्या जमिनी अंतिम निवाड्याचे वेळी वगळण्यात येतील.

आणि म्हणून त्याअर्थी, उक्त संपादन क्षेत्र जमिनीच्या नकाशा उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

अनुसूची—एक

संपादित जमिनीचा तपशील

प्रकरण क्रमांक २-अ-६५-२०२२-२०२३, मौजा सिताबर्डी, तहसील नागपूर शहर, येथील सिताबर्डी-कामठी रोड येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल.आय.सी. चौकापर्यंत विकास योजनेतील ३०.०० मीटर रुंदीचा रस्ता ३३.०० मीटर रुंद रस्ताच्या रुंदीकरण करण्याबाबतचे विवरणपत्र खालीलप्रमाणे —

अ. क्र.	आखीव पत्रिकेनुसार भूधारकाचे नाव	गट/सर्व्हे क्रमांक/ न. भू. क्र.	गा. न.नं. ७/१२ प्रमाणे/ मालमत्ता पत्रकाप्रमाणे एकुण क्षेत्र चौ. मी.	खरेदी करावयाचे क्षेत्र चौ. मी.
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	एल. आय. सी.	१८६७	४९०७.५	२६.६४
२	पिल्लर निकेतन	१८६८	६६०.०	८४.५५
३	सोसायटी ऑफ पिलार पिलार गोवा . .	१८६९	४१४६.०	१३१.१०
४	फर्म ऑफ आर.एम.एस. एक्झी बिटर्स . .	१८७०/१	१६२२.८	२६.३४
५	गिरीस को-ऑप. हौसिंग सोसायटी नागपूर . .	१८७०/२	४४९३.१	१३८.६५
६	फर्म ऑफ आर.एम.एस.एक्झी बिटर्स . .	१८७०/१	१६२२.८	३३.०७
७	स्केल विनियम प्रा. लि. तर्फे डायरेक्टर श्री. लक्ष्मण मनोहर सावंत	१८७२	९७०.४	३५.८८
८	शकुंतला हरीप्रसाद जयस्वाल व इतर मोक्याप्रमाणे चंद्रशेखर गडलवार व लक्ष्मीबाई विजय . .	१८७३	१३५०.९	४५.८३ ——— ६१.९१
९	नागपूर सुधार प्रन्यास	१८७५	२१४.५	२९.६१
१०	श्रीमती रेघेन्डा वि. वलीन्त फ्रॉकलीन . .	१९२८	९२८.२	७१.०४
११	विनय प्रकाश नायडु व इतर	१९२९	६५५.२	६९.८२
१२	मे. श्रद्धा इन्फ्राप्रोजेक्ट लि. नागपूर तर्फे संचालक श्री. नितीन गौतमजी तातिया व इतर . .	१९३०	७०५.३	५०.२७
१३	सनटेक इन्फ्रास्टेट लि. नागपूर तर्फे डाय. श्री. प्रविण मनोहरराव मोहनकर . .	२०८०	४९.४	२.००
१४	सनटेक इन्फ्रास्टेट लि. नागपूर तर्फे डाय. श्री. प्रविण मनोहरराव मोहनकर . .	२०८१	३१३६.२	३४६.०४
१५	दि. युनाईटेड चर्च ऑफ नार्थन इंडिया ट्रस्ट असोसिएशन . .	२०८२	७२०.७	४३७.६०
		एकूण. .	२६१८३.००	१५९०.३५

अनुसूची—दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:—	मंजुर विकास योजना (सुधारीत) नागपूर मौजा - सिताबर्डी-कामठी रोड येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल.आय.सी.चौकापर्यंत विकास योजनेतील ३०.०० मीटर रुंदीचा रस्ता ३३.०० मीटर रुंद रस्त्याच्या रुंदीकरण करण्याबाबत.
प्रकल्प कार्याचे वर्णन	:—	मौजा - सिताबर्डी-कामठी रोड येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल.आय.सी. चौकापर्यंत विकास योजनेतील ३०.०० मीटर रुंदीचा रस्ता ३३.०० मीटर रुंद रस्त्याच्या रुंदीकरण करण्याबाबत.
समाजाला मिळणारे लाभ	:—	नागरी विकास क्षेत्रात पायाभूत प्रकल्पामुळे रस्ते वाहतुकीतील अडथळे दूर होवून सुनियोजित शहरातील नगर विकास प्रकल्पाप्रमाणे वाहतूक व्यवस्था निर्माण करून अपघात प्रमाण कमी करणे व नगर सर्वांग सुंदर करणे व नागरिकांना त्यानुसार मोबदला देणे.

अनुसूची—तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

- निरंक -

अनुसूची—चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

- निरंक -

टीप : उक्त जमिनीच्या नकाशाचे नगर रचना विभाग, महानगरपालिका, सिव्हील लाईन्स, नागपूर यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

डॉ. विपीन,
जिल्हाधिकारी,
नागपूर.

नागपूर :
दिनांक ३१ मार्च, २०२३.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४६८.

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम ११(१) अन्वये

क्रमांक-कलि-उजिअ-भुसं-विपाविम-कावि-४३६-२०२३.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना, महसुल व वनविभाग क्र. संकिर्ण ११-२०१४-प्र.क्र.७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश “ उक्त जमीन ” असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश “ उक्त सार्वजनिक प्रयोजन ” असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, सदरहु प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल,

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याची व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश “ उक्त नियम ” असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, वर्धा यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची-एक

जमिनीचे वर्णन

भू. प्र. क्रमांक ७८-एलएक्यु- ४७-२०२१-२०२२ मौजा तळेगांव (टा.), तहसिल वर्धा, जिल्हा वर्धा,

अनुक्रमांक	भूमापन क्रमांक किंवा गट क्रमांक	क्षेत्र (अदमासे)
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	८३/१	० ११
	एकूण . .	० ११

अनुसूची—दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:—	कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा कालवे विभाग, वर्धा (पिपरी).
सिंचन योजना प्रकल्प कार्याचे वर्णन	:—	शिवापुर लघु कालवा क्रमांक १ चे अंत्य नालीचे बांधकामाकरीता.
समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा,सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात)	:—	या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा सिंचीत होणार असल्यामुळे त्या परिसरातील शेतक-यांना त्याचबरोबर ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजुर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात सुधारणा होणार आहे.

अनुसूची—तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

-कुणीही व्यक्ती किंवा कुटुंब विस्थापित होत नाही.-

अनुसूची—चार

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला)	:—	भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १०(क) व त्या अनुषंगाने महसूल व वन विभाग महाराष्ट्र शासन यांची अधिसूचना दि. १७ एप्रिल, २०१८ अन्वये सामाजिक प्रभाव निर्धारणातून सूट देण्यात आली आहे.

अनुसूची–पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ)	प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम	–	निरंक
(ब)	प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता	–	निरंक
(क)	ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील विस्तृत विवरण (निर्गमित करण्यापूर्वी भरावे)	–	निरंक

टीप :—उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, वर्धा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

राहुल कर्डिले (भा.प्र.से),
जिल्हाधिकारी,
वर्धा.

वर्धा :
दिनांक १४ मार्च, २०२३.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४६९.

प्रभारी जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, यांजकडून

वाचा.—(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण—२०१८-प्र.क्र.१३-मातंक, मुंबई, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : चोविया—२०१५-प्र.क्र.२६-वित्त-४-मंत्रालय, मुंबई, दिनांक ३० ऑगस्ट २०१९.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : चोविया—२०१५-प्र.क्र.२६-वित्त-४-मंत्रालय, मुंबई, दिनांक ३१ ऑगस्ट २०१९.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : गाजप्र-२०१९-प्र.क्र.१३६-परा-४,मंत्रालय, मुंबई, दिनांक ३१ ऑगस्ट २०१९.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक एस.व्ही.सी.आर.४३२३-स-४-९४, दिनांक २२ सप्टेंबर १९९४.

संदर्भ.—उप अधीक्षक भूमि अभिलेख, कुरखेडा येथील पत्र क्र.-न.भू.-ड्रोन सर्व्हे–परिरक्षण प्रस्ताव-मौजा नलिकसा-२०२३, दिनांक २३ फेब्रुवारी २०२३.

अधिसूचना

क्रमांक NLRMP-ड्रोन सर्व्हे-गावठाण-अधिसूचना-मौजा नलिकसा-ता. कुरखेडा-कावि ६२-१२८२-२०२३.—

स्वामित्व योजनेंतर्गत ड्रोनद्वारे गावठाण भूमापन झालेल्या मौजा नलिकसा, तालुका कुरखेडा, जिल्हा गडचिरोली या गावाचे गावठाण भूमापनाचे काम पूर्ण झाल्यामुळे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, कुरखेडा यांनी त्यांच्या अधिनस्त कुरखेडा सजामध्ये मौजा नलिकसा, हे गांव नव्याने समाविष्ट करून सजाचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेबाबत एतद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

त्यानुसार, सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक २९ मार्च २०२३ पासून होणेची आहे. उक्त गावाची सनद फी रक्कम मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक नागरी भूमापन-३-सनद फी आकारणी-प्र.क्र.१३८-२०, दिनांक १२ नोव्हेंबर २०२० अन्वये आकारणी करून सनद फी ची त्वरीत वसूली करण्यात यावी.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४७०.

वाचा.—(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण—२०१८-प्र.क्र.१३-मातंक, मुंबई, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : चोविया—२०१५-प्र.क्र.२६-वित्त-४-मंत्रालय, मुंबई, दिनांक ३० ऑगस्ट २०१९.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : चोविया—२०१५-प्र.क्र.२६-वित्त-४-मंत्रालय, मुंबई, दिनांक ३१ ऑगस्ट २०१९.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : गाजप्र-२०१९-प्र.क्र.१३६-परा-४,मंत्रालय, मुंबई, दिनांक ३१ ऑगस्ट २०१९.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक एस.व्ही.सी.आर.४३२३-स-४-९४, दिनांक २२ सप्टेंबर १९९४.

संदर्भ.—उप अधीक्षक भूमि अभिलेख, कुरखेडा येथील पत्र क्र.-न.भू.-ड्रोन सर्व्हे–परिरक्षण प्रस्ताव-मौजा चिपरी-२०२३, दिनांक २२ फेब्रुवारी २०२३.

अधिसूचना

क्रमांक NLRMP-ड्रोन सर्व्हे-गावठाण-अधिसूचना-मौजा चिपरी-ता. कुरखेडा-कावि ६०-१२८५-२०२३.—

स्वामित्व योजनेंतर्गत ड्रोनद्वारे गावठाण भूमापन झालेल्या मौजा चिपरी, तालुका कुरखेडा, जिल्हा गडचिरोली या गावाचे गावठाण भूमापनाचे काम पूर्ण झाल्यामुळे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, कुरखेडा यांनी त्यांच्या अधिनस्त कुरखेडा सजामध्ये मौजा चिपरी, हे गांव नव्याने समाविष्ट करून सजाचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेबाबत एतद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

त्यानुसार, सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक २९ मार्च २०२३ पासून होणेची आहे. उक्त गावाची सनद फी रक्कम मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक नागरी भूमापन-३-सनद फी आकारणी-प्र.क्र.१३८-२०, दिनांक १२ नोव्हेंबर २०२० अन्वये आकारणी करून सनद फी ची त्वरीत वसूली करण्यात यावी.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४७१.

वाचा.—(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण—२०१८-प्र.क्र.१३-मातंक, मुंबई, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : चोविया—२०१५-प्र.क्र.२६-वित्त-४-मंत्रालय, मुंबई, दिनांक ३० ऑगस्ट २०१९.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : चोविया—२०१५-प्र.क्र.२६-वित्त-४-मंत्रालय, मुंबई, दिनांक ३१ ऑगस्ट २०१९.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : गाजप्र-२०१९-प्र.क्र.१३६-परा-४,मंत्रालय, मुंबई, दिनांक ३१ ऑगस्ट २०१९.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक एस.व्ही.सी.आर.४३२३-स-४-९४, दिनांक २२ सप्टेंबर १९९४.

संदर्भ.—उप अधीक्षक भूमि अभिलेख, कुरखेडा येथील पत्र क्र.-न.भू.-ड्रोन सर्व्हे–परिरक्षण प्रस्ताव-मौजा सतिटोला-२०२३, दिनांक २३ फेब्रुवारी २०२३.

अधिसूचना

क्रमांक NLRMP-ड्रोन सर्व्हे-गावठाण-अधिसूचना-मौजा सतिटोला-ता. कुरखेडा-कावि ६०-१२८८-२०२३.—

स्वामित्व योजनेंतर्गत ड्रोनद्वारे गावठाण भूमापन झालेल्या मौजा सतिटोला, तालुका कुरखेडा, जिल्हा गडचिरोली या गावाचे गावठाण भूमापनाचे काम पूर्ण झाल्यामुळे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, कुरखेडा यांनी त्यांच्या अधिनस्त कुरखेडा सजामध्ये मौजा सतिटोला, हे गांव नव्याने समाविष्ट करून सजाचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेबाबत एतद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

त्यानुसार, सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक २९ मार्च २०२३ पासून होणेची आहे. उक्त गावाची सनद फी रक्कम मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक नागरी भूमापन-३-सनद फी आकारणी-प्र.क्र.१३८-२०, दिनांक १२ नोव्हेंबर २०२० अन्वये आकारणी करून सनद फी ची त्वरीत वसूली करण्यात यावी.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४७२.

वाचा.—(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण—२०१८-प्र.क्र.१३-मातंक, मुंबई, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : चोविया—२०१५-प्र.क्र.२६-वित्त-४-मंत्रालय, मुंबई, दिनांक ३० ऑगस्ट २०१९.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : चोविया—२०१५-प्र.क्र.२६-वित्त-४-मंत्रालय, मुंबई, दिनांक ३१ ऑगस्ट २०१९.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : गाजप्र-२०१९-प्र.क्र.१३६-परा-४,मंत्रालय, मुंबई, दिनांक ३१ ऑगस्ट २०१९.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक एस.व्ही.सी.आर.४३२३-स-४-९४, दिनांक २२ सप्टेंबर १९९४.

संदर्भ.—उप अधीक्षक भूमि अभिलेख, कुरखेडा येथील पत्र क्र.-न.भू.-ड्रोन सर्व्हे–परिरक्षण प्रस्ताव-मौजा दल्ली-२०२३, दिनांक २३ फेब्रुवारी २०२३.

अधिसूचना

क्रमांक NLRMP-ड्रोन सर्व्हे-गावठाण-अधिसूचना-मौजा दल्ली-ता. कुरखेडा-कावि ६०-१२९१-२०२३.—

स्वामित्व योजनेंतर्गत ड्रोनद्वारे गावठाण भूमापन झालेल्या मौजा दल्ली, तालुका कुरखेडा, जिल्हा गडचिरोली या गावाचे गावठाण भूमापनाचे काम पूर्ण झाल्यामुळे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, कुरखेडा यांनी त्यांच्या अधिनस्त कुरखेडा सजामध्ये मौजा दल्ली, हे गांव नव्याने समाविष्ट करून सजाचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेबाबत एतद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

त्यानुसार, सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक २९ मार्च २०२३ पासून होणेची आहे. उक्त गावाची सनद फी रक्कम मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक नागरी भूमापन-३-सनद फी आकारणी-प्र.क्र.१३८-२०, दिनांक १२ नोव्हेंबर २०२० अन्वये आकारणी करून सनद फी ची त्वरीत वसूली करण्यात यावी.

नंदा आंबेकर,

गडचिरोली : प्रभारी जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,

दिनांक २९ मार्च, २०२३. गडचिरोली.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.